# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक :

प्रमाण-मराठी सार्वत्रिक करणे हा प्राथमिक शिक्षणातील सध्याच्या मराठीच्या अध्ययनाच्या आणि अध्यापनाच्या पध्दतीचा मुख्य हेतू आहे. हा हेतू सफल करण्यासाठी प्रमाण-मराठी हे एकमेव साधन वापरले जाते. बोलभाषा, बोली वगैरेसारखी इतर साधने तात्पुरती म्हणूनसुध्दा वापरली जात नाहीत. ज्यावेळी सर्वसाधारण शिक्षकांचे प्रमाण-मराठीवर चांगले प्रभुत्व होते व विद्यार्थी वर्गही मुख्यत: नागरी भागातून आणि उच्च व मध्यम वर्गातून येत होता त्यावेळीही पध्दती फारशी सदोष वाटली नाही. पण सध्या बहुसंख्य प्राथमिक शिक्षकांचे मराठीवर पुरेसे प्रभुत्व असताना दिसत नाही./ दोन तृतियांशाहून अधिक विद्यार्थी ग्रामीण भागातून व गरीब आणि मागासलेल्या समाजातून येत आहेत./ यापैकी हजारो विद्यार्थी निरनिराळ्या बोलभाषा किंवा बोली बोलणारे असतात, आणि अनेकांच्या बाबतीत प्रमाण-मराठी ही दुसऱ्या भाषेसारखी असते. अशा या बदललेल्या परिस्थितीतही जुनीच पध्दत चालू राहिली आहे. त्यामुळे मराठीच्या अध्ययनात व अध्यापनात अनेक दोष निर्माण झाल्यासारखे दिसतात. सर्वसाधारण विद्यार्थ्याला प्रमाण-मराठीवर पुरेसे प्रभुत्व मिळविता येत नाही. ते मिळवायचे तर इतका खटाटोप करावा लागतो की, हे ज्ञान मिळविण्याचे साधन बनण्याऐवजी ज्ञानप्राप्तीमधील अडसर बनते, असा अनुभव येतो. भाषेवर पुरेसे प्रभुत्व मिळविणे शक्य न झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा मराठी वाङ्‌मयाशी चांगला परिचय होत नाही. त्याच्या स्वत:च्या अभिव्यक्तीबाबतही अडचणी निर्माण होतात. त्यामुळे शाळेत आलेली बोलकी मुले पुष्कळवेळा मूक बनतात. हे सगळे टाळायाचे असेल, तर सध्याच्या मराठीच्या अध्ययनाच्या व अध्यापनाच्या पध्दतीत मोठे बदल होणे आवश्यक आहे.

शिवाय सध्याच्या लोकशाहीच्या युगात मातृभाषा शिक्षणाचे पूर्वीचे ध्येय किंवा कार्यही बदलणे जरूर आहे. आपल्या भाषेद्वारा काही ठराविक वरच्या वर्गांनी उरलेल्या बहुसंख्य लोकांच्या जीवनावर प्रभुत्व गाजवावे ही भूमिका आता कुणीही मान्य करणार नाही.

मराठीचा ` भाषा ` या दृष्टीने विचार करताना ` इंग्रजी ` भाषेचा संदर्भ आवश्यक वाटतो. शिक्षणातून इंग्रजीचे पूर्णपणे उच्चाटन किंवा राष्ट्रीय एकात्मतेसाठी इंग्रजी हीच एकमेव भाषा, या दोन्ही टोकाच्या भूमिका सोडल्या तर इतर ज्या भाषा भारतात आहेत त्यापैकीच एक इंग्रजी भाषा व्हावयास हवी.

वास्तविक मराठी भाषा हे माध्यम असलेल्या शाळा असाव्यात हा जुना विचार आहे. १९२० सालापासूनच भारतामध्ये देशी भाषांचे माध्यम असलेल्या शाळा सुरू झाल्या. मातृभाषा शिक्षणाचा खरा हेतू व्यक्तिमत्व विकास, बौद्धिक क्षमता वाढविणे, जाण वाढविणे असा आहे. ` खरे तर मातृभाषेच्या अध्यापकावर फार मोठी जबाबदारी असते. इतर विषय शिकविताना माध्यम म्हणून वापरली जाणारी भाषा अचूक, नि:संदिग्ध, स्वच्छपणे वापरली जावी यासाठी मातृभाषेच्या अध्यापकाने अधिकाधिक प्रयत्न केले पाहिजेत. भाषा शिकविताना पूर्वीच्या काळी व्याकरणाचे नियम, प्रत्यय इत्यादी पाठ म्हणावून घेत असत. आज त्याऐवजी भाषिक संरचना घटवून घेतल्या जातात. भाषेत तीन लिंगे आहेत हे विद्यार्थ्याला सांगण्याऐवजी शब्दांचे वर्गीकरण करायला सांगितले जाते. सांस्कृतिक माहिती व साहित्यिक धडे भाषेच्या वर्गात शिकविले जातात आणि ह्यातून विद्यार्थ्यांची मातृभाषे-वरील पकड पक्की होईल असे मानले जाते. पण यामुळे मातृभाषेच्या शिक्षणाचा हेतू सफल होत नाही. `[१]

शिकविण्याची भाषा ही बोलीभाषा असावी की प्रमाणभाषा असावी याबाबत मात्र शिक्षणतज्ञांचे एकमत झालेले दिसत नाही. काही

शिक्षणतज्ञांचे मत असे की, शिक्षणाचे माध्यम म्हणून प्रमाणभाषा स्वीकारली पाहिजे. कोणत्याही शब्दाचा तोच अर्थ देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याची जबाबदारी जी भाषा स्वीकारते ती प्रमाणभाषा होय. आदर्शासाठी प्रमाणभाषेची आवश्यकता आहे. असे असले तरी ही बोलीभाषेला नाकारून चालणार नाही. म्हणून विद्यार्थ्याला आधीच्या भाषिक व्यवहारातून प्रमाणभाषेकडे नेणे हेच आपले उद्दिष्ट असावयास पाहिजे.त्यासाठी बोलभाषा व बोलीचा उपयोग करून घेतला पाहिजे. " माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्याला येते तीच भाषा शिकवावयाची म्हटले तर विद्यार्थ्यांच्या मनात आपण नवीन काय शिकतो असा प्रश्न निर्माण होईल व मराठी विषयाच्या अध्यापनात रस निर्माण होणार नाही. "[१]

डॅा. अशोक केळकर यांनी प्रमाणबोलीची केलेली व्याख्या येथे महत्वाची वाटते. " निरनिराळ्या प्रकारांना (किंवा भाषा-प्रकार बोलणारांना) एकत्र आणणारा मान्य असा भाषा प्रकार म्हणजे प्रमाणबोली."[२] प्रमाण-बोलीचे परिवर्तन विशिष्ट दिशेने होत असते.

१) गरजेप्रमाणे प्रमाणबोलीच्या शब्दसंग्रहात भर पडत असते.

२) प्रमाणबोलीला विशिष्ट असलेला रंग अधिकाधिक लोक तिचा वापर करू लागल्यावर पुसला जातो व प्रमाणबोलीचे सार्वत्रिकरण होते.

३) प्रमाण नसलेल्या बोलींचा प्रमाणबोलीवर परिणाम होऊन तिच्यात बदल घडतात.

" बहुंशी विद्यार्थी ग्रामीण भागातून, गरीब व मागासलेल्या समाजातून येत असतात. ते निरनिराळ्या बोलीभाषा किंवा बोली बोलणारे असतात. आणि अनेकांच्या बाबतीत प्रमाण मराठी भाषा ही दुसऱ्या भाषेसारखी असते. त्यामुळे मराठीच्या अध्ययनात व अध्यापनात अनेक दोष निर्माण झाल्यासारखे दिसतात. प्रमाण मराठी भाषेवर विद्यार्थ्यांना पुरेसे प्रभुत्व मिळविता येत नाही त्यामुळे ती ज्ञान मिळविण्याचे साधन बनण्या-

ऐवजी ज्ञानप्राप्तीतील अडसर बनते. भाषेवर पुरेसे प्रभुत्व मिळविणे शक्य न झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा मराठी वाङ्मयाशी चांगला परिचय होत नाही. त्यांच्या स्वतःच्या अभिव्यक्तीबाबत ही अडचणी निर्माण होतात."[4]

म्हणून प्रमाणभाषेने बोलीभाषेतून सामर्थ्य आत्मसात करावे आणि शिकायला येणाऱ्या मुलांच्यात प्रमाणभाषेमुळे न्यूनगंड निर्माण होऊ नये एवढी दक्षता घ्यायलाच हवी. प्रमाणभाषेवरील प्रभुत्वासाठी बोलीभाषेचा उपयोग करून घेऊन प्रमाणभाषेचा परिचय उत्तरोत्तर वाढवित नेणे आवश्यक वाटते.

<u>मातृभाषा अध्यापनाची आवश्यकता</u> :

माध्यमिक शिक्षणाचे माध्यमच मातृभाषा असल्याने सर्व विषयांचा अभ्यास विद्यार्थ्यांना मातृभाषेतूनच करावा लागतो. म्हणून त्यादृष्टीने मातृभाषेचे अध्यापनाला विशेष महत्व आहे. खरे तर सन १९११-१२ पासूनच भारतीय भाषांमधून निम्न माध्यमिक शाळेतील वर्गांना ( Lower Secondary Standards ) शिक्षण द्यावयास सुरुवात झाली. पण माध्यमिक शाळेतील वरच्या वर्गांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण अनिवार्य ठेवले.


कलकत्ता विद्यापीठ आयोगाने मातृभाषेचे महत्त्व ओळखले आणि सांगितले की, "We are emphatically of opinion that there is some thing unsound in a system of education which leaves a young man, at the conclusion of his course, unable to speak or write his own mother-tongue fluently and correctly."[5] त्यावेळच्या प्रचलित शिक्षणपध्दतीने शिकलेल्या तरुणांना आपल्या मातृभाषेतून प्रवाहीपणे आणि अचूकरित्या ना बोलता येत होते, ना लिहिता येत होते.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तयार करण्यात आलेल्या भारतीय घटनेमध्ये ही कलम २९ अन्वये, "Any sections of the citizens residing in the territory of India or any part thereof having a distinct language, script or culture of its own, shall have the right to conserve the same." शिक्षणाचे माध्यम म्हणून हिंदी भाषेला आधार मिळाला आहे. परंतु घटना प्रसिद्ध होऊन ३२ वर्षे झाली तरी सुद्धा शिक्षणाचे माध्यम म्हणून राष्ट्रभाषा हिंदीचा जेवढा वापर व्हायला हवा होता तेवढा झालेला दिसत नाही.

विद्यापीठ शिक्षण आयोगामध्ये (१९४८) शिक्षणाच्या माध्यमासंबंधी शिफारशी खालीलप्रमाणे, ` प्रादेशिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम माध्यमिक शिक्षण स्तरावर असावे. उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून ज्या प्रादेशिक भाषेचा उपयोग करावयाचा ती समृद्ध असली पाहिजे. तिचा शब्दसंग्रह वाढला पाहिजे. तोपर्यंत इंग्रजी हेच शिक्षणाचे माध्यम असावे.`

अध्यापनाची भाषा मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा ठेवण्यात विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्याचा वेळ वाचतो व अभ्यास चांगला होऊ शकतो असे दिसून आले आहे.

डॉ. कोठारी आयोगामध्ये (१९६४-६६) भाषांच्या अभ्यासाबाबत धोरण ठरविताना म्हटले आहे की, ` माध्यमिक शिक्षण मातृभाषेतून किंवा प्रादेशिक भाषेतून दिले जावे. मातृभाषा म्हणून एका विषयाचा अभ्यास करावा. राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचाही अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा, आणि संदर्भ भाषा किंवा युरोपियन भाषा म्हणून इंग्रजी भाषेचाही अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा अशी त्रिभाषा-सूत्री सुचविली आहे. संस्कृतचा अभ्यास ऐच्छिक ठेवला आहे.`[2]




डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या आयोगामध्ये जे.पी. नाईक सदस्य होते. शिक्षण आयोगामध्ये ज्या काही शिक्षण-विषयक शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत, त्यामध्ये जे.पी. नाईक यांचे शैक्षणिक विचार मोलाचे आहेत.

मुदलीयार आयोगामध्ये (१९५२-५३) भाषाविषयक शिफारशी सुचविताना पाच भाषिक गट पाडले ते असे - १) मातृभाषा, २) मातृभाषा नसलेल्या ठिकाणी प्रादेशिक भाषा, ३) राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषा, ४) संस्कृत, अरबी, फारसी, लॅटिन इत्यादी दर्जेदार भाषा, ५) आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजी भाषा.

तसेच तीन भाषिक विभागही सुचविले ते असे - १) ज्या विभागात हिंदी ही मातृभाषा असून प्रादेशिक भाषाही हिंदीच आहे आणि राष्ट्र-भाषाही हिंदीच आहे असा विभाग. २) मातृभाषा हिंदी नसलेला पण त्या विभागात लोक हिंदी बहुंशी बोलत असलेले असा विभाग. ३) ज्या विभागात

हिंदी मातृभाषा नाही, प्रादेशिक भाषाही हिंदी नाही, बहुसंख्य लोकांना हिंदी बोलता येत नाही, समजत नाही असा अहिंदी विभाग.

मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा हीच संपूर्ण माध्यमिक शिक्षण स्तरावरील शिक्षणाचे माध्यम करावे. केंद्रिय सल्लागार मंडळाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे अल्पभाषिकांना काही सवलती देण्यात याव्यात. उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावर दोन भाषांचा अभ्यास करण्यात यावा यापैकी एक मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा असावी.

मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम आणि इतर भाषाविषयक धोरण यासंबंधी निरनिराळ्या आयोगामध्ये अशाप्रकारच्या शिफारशी आढळून येतात.

मातृभाषा हे आत्माविष्काराचे माध्यम :

मातृभाषा ही आपल्या मनातील विचार, भावना, इच्छा, आकांक्षा सुखःदुखे व्यक्त करण्याचे माध्यम आहे. दुसऱ्याच्या विचारभावना, इच्छा-आकांक्षा, सुखदुःखे आपण समजावून घेऊ शकतो. म्हणून कवीकोलरीजने म्हटले आहे , "Mother-tongue is the language of heart".

मातृभाषा ही आपल्या जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. भाषा आणि विचार हे मातृभाषेने एकत्रित सांधले जातात. मातृभाषेतून लेखनाद्वारे आपण आपले विचार प्रकट करू शकतो. "Mother-tongue is the important medium by which we communicate thought both by speaking and writting."[10] म्हणून मातृभाषेचा अभ्यास आवश्यक आहे.

मातृभाषा दैनंदिन व्यवहाराचे माध्यम :

आपल्या जीवनामध्ये अनेक सामाजिक व्यवहार घडत असतात. समाजामध्ये एकोप्याची भावना निर्माण करून सामाजिक व्यवहारांचे संकलन करण्याचे कार्य मातृभाषा करते. भाषण, श्रवण, वाचन व लेखन याद्वारे आपण आपले

दैनंदिन व्यवहार पार पाडीत असतो. भाषण आणि लेखन यातून आपण आपले विचार व्यक्त करतो तर श्रवण व वाचन यातून दुसऱ्यांचे विचार आपण समजावून घेतो."[११] यासाठी आपल्याला मातृभाषा माध्यम उपयोगी पडते.

मातृभाषा ज्ञानार्जनाचे माध्यम :

जीवनाच्या भौतिक आणि दैनंदिन गरजा भागविण्यासाठीच केवळ मातृभाषा उपयोगी आहे, असे नव्हे तर ज्ञानार्जनासाठीसुद्धा मातृभाषेचा अभ्यास आवश्यक आहे. शिक्षणाचे ते एक माध्यम आहे. विविध विषयातील ज्ञान या शिक्षणाच्या माध्यमातून मिळते. राष्ट्रीय शिक्षणाची प्रथम परिषद वर्धा येथे दि. २२ व २३ आक्टोबर, १९३७ मध्ये भरली होती. वर्धा शिक्षण योजनेच्या (हिंदुस्थानी तामिळी संघ शिक्षण पद्धती) अनुषंगाने एक महत्वाचा प्रस्ताव असा की, प्राथमिक शिक्षण मातृभाषा माध्यमातून द्यावे इतकेच काय पण सुधारीत केलेल्या मूलभूत शिक्षण पद्धतीमध्ये माध्यमिक शिक्षणाचे माध्यमही मातृभाषा असले पाहिजे आणि इंग्रजी ही सक्तीची दुय्यम भाषा असली पाहिजे. महात्मा गांधीनी मातृभाषेला शिक्षणामध्ये महत्वाचे स्थान दिले होते हे त्यांच्या विचारप्रणालीवरून दिसून येते.

विवेकानंदांनी मातृभाषेच्या संदर्भात म्हटले आहे की, "You require light to light another light." म्हणून ज्ञान प्राप्तीसाठी मातृभाषेचा अभ्यास अनिवार्य आहे.

"Mother-tongue is atonce a tool, a source of joy and happiness and knowledge, a director of taste and feeling, and a means of using the highest powers that God has given us."[12]

### मातृभाषा हे संस्कृती निर्माण, संस्कृती रक्षण व संवर्धनाचे माध्यम :

जी भाषा ज्या भागामध्ये बोलली जाते त्या भागातली संस्कृती त्या भाषेत साठविली जाते. पिढयान्‌पिढया चालत आलेली संस्कृती नव्या पिढीला प्रदान करण्याचे कार्य मातृभाषा करते. मानवी जीवनात संस्कृती निर्माण, संस्कृती संरक्षण व संवर्धन यांचे मातृभाषा हे साधन आहे.

"For, if thought and inner speech are so closely interwoven that they grow and decay together, we cannot cultivate one without cultivating the other. And training the use of the mother-tongue - the tongue in which a child thinks and dreams - becomes the first essential of schooling and the finest instrument of human culture."[13]

### माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-५३) व शिक्षण आयोग (१९६४-६६) मधील शिफारशी :

मातृभाषेच्या अध्ययन-अध्यापनासंबंधी माध्यमिक शिक्षण आयोगामध्ये (१९५२-५३) नमूद केलेल्या शिफारशी अशा की, " केवळ कार्यक्षमतेने ज्ञान देणे हे अध्यापनाचे उद्दिष्ट नसावे. अपेक्षित मूल्ये, योग्य अभिरुची आणि सवयी विद्यार्थ्यांच्यात रुजवाव्यात. शाब्दिक आणि स्मरणावर आधारित अध्ययनापेक्षा हेतुपुरस्सर, मूर्त आणि वास्तव ज्ञान यासाठी कृती पध्दती ( Active Method ) आणि प्रकल्प पध्दती ( Project Method ) चा अवलंब करावा. अभ्यासपूरक उपक्रम हे शिक्षणाचा एक अविभाज्य भाग असून शाळेमध्ये शिक्षकांनी अशाप्रकारच्या उपक्रमासाठी निश्चित असा कालावधी ठरवावा."[१४]

मातृभाषा अध्ययन-अध्यापनाच्या दृष्टीने शिक्षण आयोगातील (१९६४-६६) डॉ. कोठारी यानी सुचविलेल्या शिफारशी महत्वपूर्ण वाटतात. त्या शिफारशी अशा -

" शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील परिपक्वता वाढविण्याच्या-दृष्टीने अनुभव, अभ्यास, चर्चा, सहसंबंध यामधून प्रयत्न करण्यात यावेत. विद्यार्थ्यांनी अध्यापन-कृतीमध्ये सहभागी होऊन स्वतंत्रपणे अभ्यास करण्याची गरज वाटते. विद्यार्थ्यांच्या प्रारंभीच्या शिक्षणामध्ये स्वयं-अभ्यासाची सवय, स्वविचार करण्याची सवय लागलेली नसते या सवयी माध्यमिक शिक्षणस्तरावर विद्यार्थ्यांच्यात स्थिराव्यात यादृष्टीने प्रयत्न व्हावेत." " प्रगत देशामध्ये पुष्कळ नवीन पध्दती आणि शैक्षणिक साधने विकसित होत आहेत. रेडिओचा उपयोग, दूरचित्रवाणीचा उपयोग, चित्रांचा उपयोग वर्ग अध्यापनामध्ये तसेच भाषिक प्रयोगशाळेमध्ये केला जातो. भारतात थोडीच सुचवावी वाटतात की, शाळामध्ये रेडिओ परिचित झाला आहेच पण इतरही साधने थोड्याच कालावधीत क्रमाक्रमाने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील. शिक्षक प्रशिक्षणामध्ये या सर्वांचा त्याना त्यांच्या अध्ययनात प्रथम परिचय व्हावा आणि नंतर त्यांना अध्यापनात त्यांचा उपयोग करता येईल."[१५]

माध्यमिक शिक्षणामध्ये शिक्षणाचे माध्यम
म्हणून मातृभाषेचा विकास :

सन १९५४ ते १९६२ या कालावधीमध्ये माध्यमिक शिक्षणाचे माध्यम हे इंग्रजी असूनही माध्यमिक शाळांची संख्या या कालावधीमध्ये फारच वाढली. याबाबतीत असे कारण घडले की, इंग्रजी शिक्षणाची रुची अतिशय वाढल्याने माध्यमिक शिक्षणाचा विस्तार करणे गरजेचे वाटले. भारतीय शिक्षण आयोगाने (१९६२) केलेली शिफारस अशी की, "Firstly, it had to suggest ways and means for securing a still more rapid expansion of secondary education. The rate of increase of

secondary schools and pupils had, no doubt, been rapid in the period between 1854 to 1882. But the taste for English Education had so materially increased during some period that a faster expansion of seconadary education was generally felt to be necessary."[16]

१८८२ ते १९०२ या वीस वर्षांच्या कालावधीमध्ये माध्यमिक शिक्षणाचा प्रसार वाढलेला दिसून येतो. खाली दिलेल्या सांख्यकीय आकडेवारीवरून दिसून येते.[१७]

| | १८८१-८२ | १९०१-२ |
|---|---|---|
| १) माध्यमिक शाळांची संख्या | ३,९१६ | ५,१२४ |
| २) विद्यार्थी संख्या | २,१४,०७७ | ५,९०,१२९ |

वीस वर्षांच्या कालावधीत विद्यार्थी संख्या दुप्पटीहून अधिक वाढली. शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषेला स्थान नव्हते. १८५४ च्या जाहिरनाम्यामध्ये मातृभाषेमध्ये माध्यमिक शिक्षणाला परवानगी दिली तरी त्यावेळच्या शिक्षण विभागाच्या धोरण भारतीय भाषांच्या विकासाला पोषक नव्हते.

माध्यमिक शाळा स्तरावर इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम म्हणून वापरले जात होते. अभ्यासक्रमातील विषयावर प्रभुत्व मिळविण्यापेक्षा शिक्षणाचे माध्यम आणि परीक्षा यामुळे अधिक अडचणी निर्माण झाल्या.

सन १९२१-२२ पासून शिक्षणाचे माध्यम म्हणून भारतीय भाषांचा वापर माध्यमिक शाळेतील निम्न वर्गांना सुरु झाला. पण माध्यमिक शाळेतील वरच्या वर्गांना शिक्षणाचे माध्यम इंग्रजी हेच ठेवले.

१९२१ ते १९३७ या काळामध्ये ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांची संख्या वाढली. पालक आपल्या मुलांना शहरातील शाळेमध्ये पाठविण्याऐवजी निम-शहरी व ग्रामीण भागातील शाळामध्ये पाठवू लागले. त्यामुळे विद्यार्थी संख्या वाढली.

| | १९२१-२२ | १९३६-३७ |
|---|---|---|
| मान्यता प्राप्त माध्यमिक शाळांची संख्या | ७,५३० | १३,०५६ |
| मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील विद्यार्थी संख्या | ११,०६,८०३ | २२,८७,८७२ |

मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम होऊनही ` तत्व आणि व्यवहार ` यातील संघर्षांमुळे इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम कमी झाले नाही. तथापि राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या समांतर अशा भारतीय शिक्षण संस्था सुरू होऊ लागल्या आणि क्रमाक्रमाने माध्यमिक शाळासाठी शिक्षणाचे माध्यम मातृभाषा झाले.

१९३७ ते १९४७ या काळामध्ये उत्तम दर्जाची देशी भाषेतील पुरेशी पाठ्यपुस्तके तयार झाली, पारिभाषिक शब्द अद्ययावत् झाले. सन १९४७ पासून माध्यमिक शिक्षणस्तरावर शिक्षणाचे माध्यम मातृभाषा झाले.

माध्यमिक शिक्षणस्तरावर मातृभाषा हेच सर्व विषयांच्या अभ्यासासाठी प्रभावी माध्यम म्हणून सर्वमान्य झाल्यानंतर एकाच भाषेतून सर्व विषय शिकविले व तीच मातृभाषा विशेषत्वाने भाषा म्हणून शिकविण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मातृभाषेचे ज्ञान सखोल होऊ लागले.

गेल्या दशकामध्ये झालेल्या अखिल भारतीय तृतीय सर्वेक्षणामधील महाराष्ट्रामध्ये असणाऱ्या विविध माध्यमातील माध्यमिक शाळांची आकडेवारी

खाली दिली आहे. त्यावरून प्रादेशिक भाषा किंवा मातृभाषा माध्यमातील माध्यमिक शाळांची व इतर भाषा माध्यमातील माध्यमिक शाळांच्या संख्येची कल्पना येईल.[१८]

| स्तर | माध्यमिक स्तर |
|---|---|
| प्रादेशिक भाषा | ५०११ |
| हिंदी अभाषिक भागात हिंदी. | १५७ |
| उर्दु | २०८ |
| कन्नड | ४४ |
| गुजराती | १४० |
| सिंधी | ११ |
| तेलगू | २ |
| तामीळ | १ |
| बंगाली | - |
| इंग्रजी | २१५ |

राज्यातील बहुंशी माध्यमिक शाळा प्रादेशिक भाषा माध्यमातील असल्या तरी इंग्रजी, उर्दु आणि हिंदी माध्यमातील माध्यमिक शाळाही ब-याच प्रमाणावर दिसून येतात.

| अध्यापनाचे माध्यम | | एक भाषा | दोन भाषा | तीन भाषा | चार भाषा | चारपेक्षा अधिक भाषा |
|---|---|---|---|---|---|---|
| माध्यमिक शिक्षण स्तर | ग्रामीण | ३३८४ | ५१ | ३ | - | - |
| | शहरी | १७२५ | २२७ | ७५ | ८ | ४ |
| एकूण : | - | ५१०९ | २७८ | ७८ | ८ | ४ |

यावरून, एकच भाषा शिक्षणाचे माध्यम असणाऱ्या माध्यमिक शाळांची संख्या पाच हजार एकशे नऊ व अनेक भाषा माध्यम असलेल्या माध्यमिक शाळांची संख्या तीनशे अडुसष्ट असल्याचे आढळून येते. मातृभाषा माध्यमातील शाळांची संख्या वाढलेली आढळून येते. ग्रामीण विभागामध्ये एकच भाषा शिक्षणाचे माध्यम असणाऱ्या माध्यमिक शाळा अधिक तर शहरी भागामध्ये अनेक माध्यमांच्या शाळांची संख्या ग्रामीण भागापेक्षा जास्त असल्याचे आढळून येते.

मातृभाषा म्हणून मराठी भाषेचे शासकीय व सामाजिक स्थान :

भाषावार प्रान्त रचनेमध्ये मुंबई प्रांताची ( Bombay Province ) निर्मिती झाल्यानंतर त्या ठिकाणी मराठी, गुजराती, कानडी व उर्दु भाषांच्या विकासांना विशेष प्रोत्साहन मिळाले. "The Director of Public Instruction, Bombay reported that in his province, similar facilities were offered for Marathi, Gujarathi, Canarese and Urdu."[20]

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि मराठी भाषेला राज्यभाषा म्हणून मान मिळाला. तरी शासकीय कारभारामध्ये अजूनही इंग्रजी भाषेचे प्राबल्य अधिक दिसून येते. शासकीय परिपत्रके, न्यायालयातील भाषिक व्यवहार हे इंग्रजीमध्ये चाललेले दिसून येतात. " जर राज्यशासनाने प्रादेशिक भाषा आणि केंद्र शासनाने राष्ट्रभाषा म्हणून हिंदीशिवाय कोणत्याही प्रकारचा अंतर्गत व्यवहार करावयाचा नाही असे ठरविले असते आणि राज्यपातळीवर प्रादेशिक भाषा आणि देशपातळीवर हिंदी भाषा या दोनच भाषातून सर्व व्यवहार केले असते तर महाराष्ट्रामध्ये प्रादेशिक भाषा म्हणून मराठी भाषेला याहूनही अधिक चांगले स्थान प्राप्त झाले असते."[२१]

अखिल भारतीय तृतीय शैक्षणिक सर्वेक्षण गेल्या दशकामध्ये झाले असून महाराष्ट्रातील ` अध्यापनाची प्रथम भाषा ` या नुसार ग्रामीण शाळांची आकडेवारी पुढे दिली आहे.[११] पृ. १६ व १७ वरील तक्ता पहा.

ग्रामीण भागातील ज्या शाळांमध्ये मराठी प्रथम भाषा म्हणून अध्यापन केले जाते अशा शाळांची संख्या सर्वाधिक असल्याचे आढळते. यानंतर अध्यापनाची प्रथम भाषा या नुसार उर्दू, कन्नड, हिंदी, इंग्रजी असा शाळांच्या संख्येचा उतरता क्रम असल्याचे दिसून येते.

शहरी भागातील ज्या शाळांमध्ये मराठी प्रथम भाषा म्हणून अध्यापन केले जाते अशा शाळांची संख्या सर्वाधिक असली तरी उर्दू, इंग्रजी, हिंदी, कन्नड या प्रथम भाषा म्हणून अध्यापन करणाऱ्या शाळांची संख्या ग्रामीण भागापेक्षा शहरामध्ये अधिक असल्याचे आढळून येते.

घटनेमध्ये मान्य केल्याप्रमाणे हिंदी ही राष्ट्रभाषा असली, आणि आपल्या राज्यामध्ये प्रादेशिक भाषा म्हणून मराठी भाषेला श्रेय मिळाले असले तरी इंग्रजीच्या अध्ययन-अध्यापनाला जास्त महत्व आले आहे. निरनिराळ्या स्पर्धात्मक परीक्षा इंग्रजी भाषेतून घेतल्या जातात.

विद्यार्थ्यांचे पालकही आपल्या पाल्याचा इंग्रजी विषयाचा अभ्यास अधिक चांगल्याप्रकारे कसा होईल याकडे मातृभाषेच्या अभ्यासापेक्षा अधिक लक्ष पुरवितात. काही पालक तर पुष्कळ खर्च करून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यम असलेल्या शाळेत घालतात. या कारणामुळे समाजात इंग्रजी भाषेला मराठी भाषेपेक्षा प्रतिष्ठेची भाषा म्हणून पाहिले जाते.

इंग्रजी ही वाङ्मयसमृद्ध भाषा आहे. मराठी भाषेमध्ये असणारे वाङ्मय तुटपुंजे आहे. जे काही वाङ्मय इंग्रजी भाषेतून मराठी भाषेमध्ये अनुवादित झाले आहे त्यातील पारिभाषिक शब्द विद्यार्थ्यांच्यादृष्टीने अनाकलनीय वाटतात. शिवाय अनुवादित ग्रंथातील भाषा ही संस्कृतप्रचुर

असल्याने त्यात क्लिष्ट आणि बोजड शब्द अधिक आढळतात.त्यामुळे अनुवादित ग्रंथातील मराठी भाषा समजण्याच्यादृष्टीने कठीण झाली आहे. संस्कृत ही भाषा माध्यमिक शाळा स्तरावर ऐच्छिक ठेवली असल्याने मराठी भाषेला पूरक संस्कृतचा अभ्यास उपयुक्त व्हावा तेवढा होत नाही.

भाषाविषयक धोरण :

सन १९६४ मध्ये नियुक्त केलेल्या डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखालील शिक्षण आयोगाने भाषाविषयक धोरण सुचविताना खालीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आढळतात.

" भाषाविषयक धोरण व राष्ट्रीय एकात्मता यामध्ये सुसंवाद राखण्याच्यादृष्टीने प्राथमिक शाळेपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यन्त मातृभाषा शिक्षणाचे माध्यम असावे त्यामुळे विशिष्ट सुशिक्षित लोक आणि सर्वसामान्य जनता यांच्यात एकात्मता साधता येईल. विज्ञान व तंत्रज्ञान यांच्यातील विचारांची उच्चतम पातळी प्रादेशिक भाषातील नवीन लेखनात यावी. इंग्रजी ऐवजी मातृभाषा अध्यापनाचे माध्यम स्वीकारताना अध्यापनाचा दर्जा उच्च ठेवण्याची खटपट कायम राहिजे."[१२]

माध्यमिक शिक्षण स्तरावर त्रिभाषा-सूत्री योजनेची शिफारस याच शिक्षण आयोगामध्ये केल्याचे आढळते. उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षणामध्ये भाषांच्या अभ्यासाबाबत असे सुचविले की, "The three-language formula should be extended to the University stage also. In our opinion, this would place a heavy language load on students and load on students and lead to a waste of scarce resources and deterioration of standards of subject knowledge in higher education. The study of two

languages only should be compulsory at higher secondary stage. In higher education, the study of language should not be compulsory."[24]

माध्यमिक शिक्षण आयोगामध्ये (१९५२-५३) भाषाविषयक धोरण स्पष्ट करताना तीन विभाग पाडले - (१) ज्या विभागामध्ये हिंदी मातृभाषा, प्रादेशिक भाषा आणि राष्ट्रभाषा म्हणून एकच आहे.
(२) मातृभाषा हिंदी नसलेला पण बहुंशी हिंदी बोलत असलेला विभाग.
(३) हिंदी ही मातृभाषाही नाही, प्रादेशिक भाषाही नाही, हिंदी बोलता येत नाही आणि समजत नाही असा अहिंदी विभाग.

तीन भाषा सक्तीच्या खेरीज संस्कृत, अरबी, फारसी आणि लॅटीन या भाषांचा अभ्यास ऐच्छिक ठेवण्यात यावा.

१९५२-५३ मध्ये माध्यमिक शिक्षण आयोगाने सुचविलेल्या या भाषाविषयक धोरणामध्ये बदल करण्याचा विचार केंद्रिय शिक्षण सल्लागार मंडळ, १९५५, कलम ५ प्रमाणे मांडला. " संस्कृत हा विषय सक्तीची भाषा म्हणून माध्यमिक शिक्षणामध्ये अभ्यासासाठी समाविष्ट करावा."[२५] केंद्रिय शिक्षण सल्लागार मंडळाने भाषिक आणि सांस्कृतिकदृष्टया संस्कृतचे महत्व पूर्ण ओळखले होते. तथापि चौथी संस्कृत ही भाषा सक्तीची केली तर विद्यार्थ्यांच्यावर भाषा अभ्यासाचा बोजा अधिक वाढेल म्हणून त्रिभाषा सूत्री धोरणास मान्यता दिली. आणि संस्कृतला ऐच्छिक विषयाचा दर्जा प्राप्त करून देण्यात आला.

### मराठी भाषेच्या अध्ययन-अध्यापन विषयक समस्या :

मराठीच्या अध्ययन-अध्यापनासंबंधीचे वास्तव स्वरूप काय आहे, त्याला काही नवीन दिशा मिळतात का, मराठी भाषेचे अध्ययन-अध्यापन अधिक

परिणामकारक कसे करता येईल, मराठी भाषाविषयक व्यवहार समृद्ध कसा होईल याविषयी माहिती मिळवून त्यामधून काही प्रकल्प, काही कार्यक्रम हाती घेता येतील का, त्याचे स्वरूप स्पष्ट करता येईल का यासंबंधी विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

मराठी भाषेच्या अध्ययन-अध्यापनामध्ये काही मूलभूत स्वरूपाच्या समस्या आहेत. प्रमाणभाषा व बोलीभाषा यातील फरकामुळे आपण ज्या भाषेतून शिक्षण घेतो ती जर परकी वाटत असेल आणि त्यामुळे जर शिक्षणक्षेत्रात गळती लागली असेल तर ती दूर करता येईल का ? दूर करता येत असेल तर त्यासाठी कोणकोणते उपाय योजले पाहिजेत, हा ही भाग विचार करण्यासारखा आहे.

मुलांच्या घरी बोललेली भाषा व शाळेत बोलली जाणारी भाषा यातील फरक शोधून त्याना शाळेत बोलल्या जाणाऱ्या प्रमाणित भाषेशी संबंध काय ते सर्वेक्षण करून काढता येईल. याच संदर्भात क्रमिक पाठ्यपुस्तकांचे पुनर्लेखन करून ते वापरणे आवश्यक आहे काय ? हे ही तपासून पहाता येईल.

मराठी भाषेच्या अध्ययन-अध्यापनामध्ये दृक्-श्राव्य साधनांचा वापर करून अध्ययन-अध्यापन प्रभावी करता येईल काय हे प्रयोगाने पडताळून पहाता येईल.

ग्रामीण पातळीवर बोलल्या जाणाऱ्या बोलभाषांचा शब्दकोश तयार करण्याचा प्रकल्प हाती घेता येईल. त्यामुळे ग्रामीण मराठी आणि नागर मराठी यातील अंतर समजून घेण्यास मदत होईल.

मराठीचे अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यासाठी जनसंपर्काच्या माध्यमाचा उपयोग किती करता येईल हे पाहण्यासारखे आहे. तसेच भाषा शिक्षणाचे पाठ प्राथमिक स्तरावर वृत्तपत्रातून देता येतील काय ? ते कितपत उपयुक्त ठरतील याचा अभ्यास करता येण्यासारखा आहे.

मराठीच्या अध्ययन-अध्यापनाचा भाषाशास्त्राशी विशेषत: उपयोजित भाषाशास्त्राशी ( applied linguistic ) संबंध आहे. तो संबंध कोणता हे संशोधून त्याचा उपयोग करून घेता येईल.

मराठीच्या अध्ययन-अध्यापनाला उपयुक्त असे काही पूरक साहित्य तयार करता येईल काय, ते कितपत परिणामकारक आहे हे तपासून पहाता येईल काय ? याविषयी एक प्रकल्प हाती घेता येईल.

पाठांतरासाठी उतारे कोणते घ्यावे, ते कसे पाठांतर करावे व ते निबंध लेखनात कितपत उपयुक्त ठरते याचा प्रयोगात्मक तौलनिक अभ्यास करता येईल. मराठीचे अध्ययन-अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका तयार करण्याचे प्रकल्प हाती घेता येतील.

मराठी भाषा विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यासाठी मराठीच्या अध्यापकाला आवश्यक असलेले गुण कोणते ? कोणत्या प्रकारची भाषाकौशल्ये किती प्रमाणात आवश्यक आहेत ? आणि कोणत्या क्षमता (उदा. संदर्भ ग्रंथ पहाण्याची क्षमता) आवश्यक आहेत ? या विषयींची प्रमाणके तयार करून प्रमाणित कसोट्या तयार करता येतील.[२६]

मराठी विषयाच्या अध्यापकास अशाप्रकारच्या अनेक अध्ययन-अध्यापन विषयक समस्यांचा विचार करता येण्यासारखा आहे व त्यातून काही प्रकल्प घेता येण्यासारखे आहेत.

<u>संशोधन समस्या</u> :

प्रस्तुत संशोधनासाठी ` माध्यमिक शाळामधील मराठी अध्यापकास प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक ते गुण व भाषाकौशल्ये किती प्रमाणात आवश्यक त्याची प्रमाणके तयार करणे ` हा विषय निवडण्यात आला.

<u>संशोधन समस्येचे स्पष्टीकरण</u> :

संशोधन समस्येतील संज्ञांचा अर्थ -

१) माध्यमिक शाळा - तासगांव, खानापूर व वाळवा तालुक्यातील इ. ८ वी ते १० वी चे वर्ग असणारी शाळा.

२) मराठी अध्यापक - वरील तालुक्यात मराठी विषयाचे अध्यापन करणारा अध्यापक.

३) प्रभावी अध्यापन - नवीन अनुभव, ज्ञान व कल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजण्यासाठी अभिरुची केंद्रित, कृतिकेंद्रित व अनुभवकेंद्रित अध्ययन व्हावे म्हणून मार्गदर्शन करणे.

४) गुण - अध्यापकांच्या अध्ययन-अध्यापन क्रियातून व्यक्त होणाऱ्या वृत्ती.

<u>संशोधन समस्येची उद्दिष्टये</u> :

अ) मराठी अध्यापकास आवश्यक असणाऱ्या गुणांचा अभ्यास करणे.

ब) मराठी अध्यापकास आवश्यक त्या भाषाकौशल्यांचा अभ्यास करणे.

क) मराठी विषयाचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी गुण व भाषा-कौशल्ये किती प्रमाणात आवश्यक या विषयीची प्रमाणके तयार करणे.

ड) मराठी विषयाचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी उपाय सुचविणे.

<u>संशोधनातील गृहीतके</u> ( <u>Assumptions</u> )

१) मराठी अध्यापकाकडे निश्चित असे गुण असावे लागतात.

२) मराठी अध्यापकाकडे निश्चित अशी भाषाकौशल्ये असावी लागतात.

३) मराठी विषयाच्या प्रभावी अध्यापनासाठी अध्यापकाकडील गुण व भाषाकौशल्ये उपयुक्त असतात.

४) मराठी अध्यापकाकडील गुण व भाषाकौशल्ये त्यांच्या अध्ययन-अध्यापनकृतीत उतरतात.

संशोधन समस्येचे महत्व :

मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांना आपल्याजवळ कोणकोणत्या गुणांची व भाषाकौशल्यांची आवश्यकता आहे याची निश्चित कल्पना या संशोधनावरून येईल असे वाटते. मराठी विषय सोपा म्हणून तो कोणत्याही अध्यापकाने शिकवावा अशी अवस्था माध्यमिक शाळांमध्ये आपल्याला आढळते. माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांनाही या संशोधनाचा व्यावहारीक फायदा होणार आहे. आवश्यक ते गुण आणि भाषाकौशल्ये ज्या अध्यापकांचेकडे उपलब्ध आहेत अशा अध्यापकांचेकडे मराठी विषयाचे अध्यापन करण्यास सोपविणे सुलभ होणार आहे. विद्यार्थी हा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील महत्वाचा घटक असल्याने अध्ययन-अध्यापन परिणामकारक होण्याच्यादृष्टीने अध्यापकाकडे कोणते गुण व भाषाकौशल्ये असली पाहिजेत याची स्पष्टता विद्यार्थ्यांना होणार आहे. अध्यापनाच्यादृष्टीने अध्यापकांच्यात मराठी विषयाचे वाटप करताना मुख्याध्यापकांची जबाबदारी वाढलेली आहे.

"A Teacher has to be a prophet who can look into the future and see the world of tommorrow into which the children of today must fit."[27] याचा विचार मुख्याध्यापकांना आणि अध्यापकांना निश्चितपणे करावा लागणार आहे. अध्यापकांनीही आपल्या अंगच्या गुण व भाषाकौशल्ये यांचे आत्मनिरीक्षण केल्यास, अध्यापनात जी शिथीलता येते त्यास अन्य घटकाला जबाबदार धरण्याची प्रवृती कमी होईल व आवश्यक ते गुण व भाषाकौशल्ये संपादण्यास मदत होईल.

"A Teacher teaches by -

What he says -

What he does -

What he is !"[28]


मराठी भाषेचा अभ्यास करून मराठी अध्यापक होण्याची स्वप्ने बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांनाही कोणते गुण आणि भाषाकौशल्ये किती प्रमाणात आवश्यक याचे आत्मनिरीक्षण करून पहाता येईल.

समाजाचे घटक म्हणून पालक आपल्या पाल्याच्या अध्ययनाच्यादृष्टीने अध्यापकाकडून अध्यापनविषयक काही अपेक्षा करतात ही सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन मराठी अध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल अशी आशा वाटते.

संशोधनाच्या मर्यादा :

सांगली जिल्ह्यामध्ये तासगाव तालुका आहे. या तालुक्यात ४१ माध्यमिक शाळा आहेत. प्रत्येक माध्यमिक शाळेतील दोन ज्येष्ठ मराठी अध्यापक संशोधनासाठी समाविष्ट केले तरी संशोधनातील जनसंख्या (Population) ८२ इतकी होते. पण संशोधनातील ही जनसंख्या भक्कम आधाराचे वास्तव निष्कर्ष मिळण्यासाठी अपुरी वाटल्यावरून संशोधन क्षेत्र वाढवून घेतले. तासगाव तालुक्याला लागूनच खानापूर व वाळवा तालुका आहे. (पृष्ठ क्र. २५ वरील संशोधन क्षेत्राचा नकाशा पहा). म्हणून हे दोन्ही तालुके संशोधन क्षेत्रामध्ये वाढवून घेतले. खानापूर तालुक्यातील सर्व ३६ माध्यमिक शाळा व वाळवा तालुक्यातील सर्व ४२ माध्यमिक शाळा संशोधन क्षेत्रामध्ये घेतल्या. या तालुक्यातील प्रत्येक माध्यमिक शाळेतील दोन ज्येष्ठ मराठी अध्यापक असे खानापूर तालुक्यातील ७२ मराठी अध्यापक, वाळवा तालुक्यातील ८४ मराठी अध्यापक व तासगाव तालुक्यातील ८२ मराठी अध्यापक अशी मिळून संशोधनातील जनसंख्या ( Population ) २३८ झाली आहे.

सांगली जिल्हा: तालुके



जनसंख्येतील सर्व एककांचा ( elements ) अभ्यास करण्यापेक्षा जनसंख्येतील काही एककांची निवड करून त्यांच्या अभ्यासावरून आवश्यक ती माहिती मिळविणे हे सामान्यतः पैसा, श्रम व वेळ ह्या तिन्हीदृष्टीने कमी खर्चाचे असते. त्यातील १५६ मराठी अध्यापक स्तरीत यादृच्छिक नमुना ( stratified random sample ) पद्धतीने संशोधन अभ्यासासाठी निवडले.

सांगली जिल्ह्यात एकूण २४५ शासनमान्य माध्यमिक शाळा आहेत. त्यातील ११५ माध्यमिक शाळा तासगाव, खानापूर आणि वाळवा तालुक्यांमध्ये आहेत. इतर तालुक्यातील माध्यमिक शाळांच्यापेक्षा या तीन तालुक्यातील माध्यमिक शाळांची संख्या तुलनेने अधिक आहे. म्हणून संशोधनामध्ये अधिक जनसंख्येचा ( Population ) अभ्यास होण्याच्यादृष्टीने योग्य संशोधन क्षेत्र ठेवले आहे.

----------

टीप : या संशोधन अहवालातील पारिभाषिक शब्दांसाठी " शिक्षणशास्त्र पारिभाषिक कोश " वापरला आहे.

## टीपा - संदर्भसूची


१. भागवत विद्युत, " भाषा शिक्षणासंबंधी काही विचार, " आधार निबंध, भारतीय शिक्षणशास्त्र संस्था, (विद्याभारती), पुणे, पृ.३.

२. दावतर वसंत, " मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन, " परिसंवाद अहवाल, भारतीय शिक्षणशास्त्र संस्था, गो.ध. पारीख शैक्षणिक अभ्यास केंद्र मुंबई, पृ. ४.

३. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, " भाषेचे नियमन " एप्रिल-जून, १९६७ चा अंक.

४. नाईक जे.पी., " प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर मराठी भाषेचे अध्यापन, " शोधनिबंध, पृ. २.

५. Naik J.P. and Syed Nurullah, "A Student's History of Education in India (1800 to 1973)", MacMillan Company of India, Bombay, Sixth Edition, 1974, pp. 296-97.

६. माळी एम्.जी., " शैक्षणिक प्रश्न, पुनर्रचना आणि राष्ट्रविकास, " नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९७०, पृ. १५५.

७. कोठारी आयोग, " शिक्षण आयोग (१९६४-६६) अहवाल, " शिक्षण आणि राष्ट्रविकास, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, पृ. १९४.

८. बापट भा.गो., " शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास, " व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७३, पृ. ९७.

९. मुदलीयार आयोग, " माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-५३) अहवाल " शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, पृ. २२२.

१०. Ryburn, W.M., "The Teaching of the Mother-tongue", Oxford University Press, London, Third Edition, p.6.

२१. माळी एम्.जी., " शैक्षणिक प्रश्न, पुनर्रचना आणि राष्ट्रविकास,"
निलकंठ प्रकाशन, पुणे, १९७०, पृ. १५५.

२२. अखिल भारतीय तृतीय शैक्षणिक सर्वेक्षण - महाराष्ट्र राज्य, तक्ते,
आवृत्ती पहिली. Survey and Data Processing Unit, National
Council of Educational Research and Training, New Delhi,
p. 113, 113(a).

२३) बापट भा.गो., " शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक
विकास," व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७३, पृ. ९९.

२४. कोठारी आयोग, " शिक्षण आयोग (१९६४-६६) अहवाल "
शिक्षण व राष्ट्रीय विकास, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार,
पृ. १९६.

२५. " माध्यमिक शिक्षण पुनर्रचना," शिक्षण मंत्रालय, भारत सरकार,
१९६७, पृ. ३८.

२६. भारतीय शिक्षणशास्त्र संस्था (विद्याभारती पुणे), गो.ध. पारीख
शैक्षणिक अभ्यासकेंद्र, मुंबई ह्यांच्यावतीने आणि शिक्षणशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या सहकार्याने दिनांक १६ व १७
फेब्रुवारी, १९८१ रोजी " मराठीचे अध्ययन-अध्यापन" या विषयावर
झालेल्या परिसंवादाचा अहवाल.

२७. August Kerber, "Quotable Quotes on Education",
Wayne State University Press, Detroit, 1968, p. 98
Quotation by ANONYMOUS.

२८. August Kerber, "Quotable Quotes on Education", Wayne
State University Press, Detroit, 1968, p. 112,
Quotation by DOAN, ELEANOR, L.

११. सेक्लेकर ऊ.र., " खऱ्या शिक्षकाचा शोध," भारतीय ग्रंथ भवन, दादर, मुंबई, पृ. १२८.

१२. Ryburn W.M., "The Teaching of the Mother-tongue", Oxford University Press, London, Third Edition, p. 9.

१३. Ballard, P.B., "Thought and Language", University of London Press, p. 17.

१४. मुदलीयार आयोग, " माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-५३) अहवाल," शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, पृ. २३४.

१५. कोठारी आयोग, " शिक्षण आयोग (१९६४-६६) अहवाल," शिक्षण आणि राष्ट्रीय विकास, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, पृ. ७४.

१६. Naik J.P. and Nurullah Syed, "A Student's History of Education in India (1800 to 1973)", MacMillan Company of India, Bombay, Sixth Edition, 1974, p. 195.

१७. " भारतीय शिक्षण आयोग " (१८८२), पृ. १९३.

१८. भारतीय तृतीय शैक्षणिक सर्वेक्षण - महाराष्ट्र राज्य, तक्ते, आवृत्ती पहिली. Survey and Data Processing Unit, National Council of Educational Research and Training, New Delhi, p. 112.

१९. " भारतीय तृतीय शैक्षणिक सर्वेक्षण - महाराष्ट्र राज्य, तक्ते, आवृत्ती पहिली. Survey and Data Processing Unit, National Council of Educational Research and Training, New Delhi, p. 112.

२०. " माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना," शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, १९६७, पृ. ३२.